लोकमत

# ‘जेडीआयईटी’चे चार विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले


अक्षता झाटे


पूजा चौधरी


प्रीती राऊत


तृप्ती राऊत

लोकमत न्यूज नेटवर्क

**यवतमाळ :** जवाहरलाल दर्डा एज्युकेशन सोसायटी संचालित येथील जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातील चार विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत झळकले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने घेतलेल्या सत्र २०२०-२०२१ च्या परीक्षेत त्यांनी हे यश मिळविले आहे.

अक्षता झाटे, पूजा चौधरी आणि प्रीती राऊत यांनी गुणवत्ता यादीत प्रथम स्थान प्राप्त केले. तृप्ती राऊत ही गुणवत्ता यादीत पाचवी आली आहे. सततचा सराव आणि जिद्दीच्या जोरावर या विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले. त्यांच्या यशाचे कौतुक होत आहे.